मुंबई विद्यापीठ

क्र. घ.म./ २ / २०१३ - २०१४

परिपत्रक :-

मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांना कळविण्यात येते की, अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द करून त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करणेबाबत शासनाने परिपत्रक क्र. संकिर्ण - २०१३/(८१/२०१३)/विशि-१ दिनांक ८ एप्रिल २०१३, अन्वये आदेश निर्गमित केलेले आहेत. सोबत शासन परिपत्रक व शासन निर्णयाची प्रत जोडली असून सदरच्या शासन निर्णय व परिपत्रकाप्रमाणे महाविद्यालय स्तरावर पुढील कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय व परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.govt.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्यांचा संकेतांक कमांक २०१३०४०८१४२७०५९३०८ असा आहे.

मुंबई - ४०० ०३२.
दिनांक :- २२ मे, २०१३.

कुलसचिव

प्रति,

मुंबई विद्यापीठाशी संलग्नित अशासकीय अनुदानीत / विनाअनुदानीत कला, वाणिज्य, विज्ञान, विधी, अध्यापक, नृत्य, होम सायन्स आणि सोशल वर्क, अभियांत्रिकी, औषधनिर्माणशास्त्र, व्यवस्थापन आणि स्थापत्यशास्त्र महाविद्यालयांचे प्राचार्य व महाविद्यालयातर्फे संबंधित संस्थाचे अध्यक्ष/ सचिव यांचे माहितीसाठी आणि पुढील कार्यवाहीसाठी.

प्रत माहीतीसाठी रवाना :-

१. मा. उपसचिव, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
२. मा. संचालक, उच्च शिक्षण,महाराष्ट्र राज्य, पुणे - ४११ ००१.
३. सह संचालक, मुंबई विभाग, मुंबई - ४०० ००१.
४. संचालक, महाविद्यालये व विद्यापीठ विकास मंडळ, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
५. प्र.गि. कानडे, कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय विस्तार भवन, मुंबई - ४०० ०३२.
६. कुलगुरूंचे कार्यकारी सचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
७. स्वीय सहायक, कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, मुंबई - ४०० ०३२.
८. अभिलेखा विभाग (रेकॉर्ड सेक्शन) (१० प्रती).

कुलसचिव

(1)

अकृषी विद्यापीठे व संलग्नित महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांना लागू असलेले महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाणसंहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवाशर्ती) नियम, १९८४ रद्द करून त्याऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियमातील तरतूदी लागू करणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**उच्च व तंत्र शिक्षण विभाग**
शासन पूरक पत्र क्रमांकः संकिर्ण २०१३/(८१/२०१३)/विशि-१
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई ४०० ०३२
दिनांक : ०८ एप्रिल,२०१३

वाचा : १) शासन निर्णय क्रमांक :- उच्च व तंत्र शिक्षण विभाग, संकिर्ण २०१०/(३१२/२०१०)/१/ विशि-१; दि. २० मे, २०१०

**प्रस्तावना :-** महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नित महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेत्तर पदांच्या अटी व सेवा शर्ती), नियम, १९८४ मधील तरतूदी दि. १ मे, १९८५ पासून अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयांना लागू करण्यात आल्या होत्या. तथापि, सदर प्रमाण संहिता सुमारे २६ वर्षापूर्वीची असून त्यामध्ये आवश्यकतेनुसार अद्याप कोणत्याही सुधारणा करण्यात आलेल्या नव्हत्या, त्याचप्रमाणे वेगवेगळया विद्यापीठामध्ये कर्मचाऱ्यांना मिळणाऱ्या लाभामधील तफावतीमुळे कर्मचाऱ्यामध्ये अस्वस्था निर्माण झाली होती. या संदर्भात मा. कुलपतीकडे अनेक वेळा चर्चा होऊन अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यासाठी सामाईक परिनियम (Common Statute) तयार करण्यात यावेत व सदर समाईक परिनियम लागू होईपर्यंत प्रमाणसंहिता नियमाच्या ऐवजी महाराष्ट्र नागरी सेवा नियम लागू करण्यात यावेत असा निर्णय घेण्यात आला. त्यानुसार दि. २० मे, २०१० रोजी शासन निर्णय निर्गमित करण्यात आलेला आहे.

Registrar's Secretariat
R. No. 95 8/11/13
Section/Unit Comm
Registrar
Dy. Registrar
Asstt. Registrar

अकृषी विद्यापीठे व महाविद्यालयासाठी अस्तित्वात असलेली प्रमाणसंहिता शासन निर्णय दिनांक २० मे,२०१० अन्वये रद्द केल्यानंतर अकृषी विद्यापीठातील त्यांच्या शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या भरतीसाठी

परिनियमाद्वारे सेवा प्रवेश नियम तयार केले असून त्यानुसार अकृषी विद्यापीठातील भरती प्रक्रिया सुरु आहे. संबंधित अकृषी विद्यापीठांनी किंवा यथास्थिती संचालक, उच्च शिक्षण व संचालक, तंत्र शिक्षण यांनी अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या भरती प्रक्रिये संदर्भात सेवा प्रवेश नियम तयार करणे अभिप्रेत होते. तथापि, असे सेवा प्रवेश नियम अद्यापही तयार करण्यात आले नसल्याचे शासनाच्या निर्दशनास आले आहे. त्यामुळे संदर्भाधीन दि. २० मे, २०१० शासन निर्णयास पूरकपत्र काढून अकृषी विद्यापीठांशी संबंधित अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांच्या सेवाभरतीसाठी कोणते सेवा प्रवेश नियम वापरावेत याबाबतचे आदेश निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

## पूरकपत्र

प्रस्तावनेत नमूद केल्याप्रमाणे राज्यातील अकृषी विद्यापीठांशी संलग्नित असलेल्या अशासकीय महाविद्यालयातील शिक्षकेत्तर पदांच्या सेवा भरती नियमांबाबत खालीलप्रमाणे शासन मान्यता देत आहे :-

(1) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण् २०१०/(३१२/२०१०)/विशि १, दिनांक २० मे,२०१० च्या परिच्छेद ७(२) मध्ये विहित केलेल्या समितीची परिच्छेद ७(५) मध्ये विहित केलेली मुदत दिनांक ३० मे, २०१३ पर्यंत वाढविण्यात येत आहे.

(2) या कालावधीत समितीने अकृषी विद्यापीठांशी संलग्नीत अनुदानित महाविद्यालयातील शिक्षकेतर पदे भरण्यासाठी आवश्यक असलेले सेवा प्रवेशाचे तयार केलेले नियम किंवा अधिस्विकृत केलेले नियम शासनाकडून दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत संचालक (उच्च शिक्षण) मान्य करुन घेतील.

(3) दिनांक २० मे,२०१० ते दिनांक ३० जून, २०१३ या कालावधीतील भरती महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्नीत महाविद्यालये प्रमाण संहिता (शिक्षकेतर पदांच्या अटी व सेवाशर्ती), नियम १९८४ मधील सेवा भरतीच्या नियमानुसार झाली असल्यास सदर भरती नियमीत असल्याचे मान्य करण्यात येत आहे. तसेच दिनांक ३० जून, २०१३ पर्यंत प्रमाण संहिते मधील तरतूदी प्रमाणे रिक्त पदे भरती करण्यास अनुज्ञेयता देण्यात येत आहे.

२. सदर शासन निर्णय महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, १९९४ मधील कलम ८(४), कवी कुलगुरु कालिदास संस्कृत विश्वविद्यालय अधिनियम १९९७ मधील कलम ८(४), डॉ.बाबासाहेब आंबेडकर तंत्रशास्त्र विद्यापीठ अधिनियम, १९८९ व यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ अधिनियम, १९८९ मधील तरतुदी नुसार प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

३. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharastra.govt.in या संकेत स्थळावर उपलब्ध करुन देण्यात आला असून त्यांचा संकेताक क्रमांक २०१३०४०८१४२७०५९३०८ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

( विकास तु.कदम )
कार्यासन आधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,
१) मा. राज्यपाल तथां कुलपती यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा.कुलगुरु, सर्व अकृषी विद्यापीठे
३) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
४) सर्व सहसचिव / उपसचिव / अवर सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
५) मा. मंत्री ,(उवतंशि), यांचे खाजगी सचिव
६) मा. राज्यमंत्री, (उ.व तं. शि.), यांचे खाजगी सचिव.
७) संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) संचालक, तंत्रशिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई
९) कुलसचिव, सर्व अकृषी विद्यापीठे
१०) सर्व कार्यासन अधिकारी, उच्च व तंत्रशिक्षण विभाग
११) निवड धारिका विशि-१